**भारतीय प्रेक्षकांनी अतिनैसर्गिक शक्तींवर आधारित चित्रपट, मालिका नेहमीच उचलून धरल्या. काही वर्षांपूर्वी इच्छाधारी नागीण या विषयावर बरेच चित्रपट आले. येत्या काळातही या विषयावर आधारित चित्रपट आले तर आश्चर्य वाटायला नको.**

# कोण असेल इच्छाधारी नागीण?



अतिनैसर्गिक शक्ती, फँटसीसारखे विषय बॉलिवूडने नेहमीच उचलून धरले. भारतीय प्रेक्षकांनाही असे चित्रपट भावतात. सध्या 'नागीन' या मालिकेच्या निमित्ताने ही नागाने सूड उगवण्याची थीम बरीच लोकप्रिय ठरत आहे. म्हणूनच बऱ्याच निर्मिती संस्था या विषयावर आधारित चित्रपट करण्याच्या तयारीत आहेत. येत्या काळात चित्रपटांमध्ये इच्छाधारी नागीन बघायला मिळाली तर आश्चर्य वाटायला नको. इच्छाधारी नागीन हा विषय भारतीय प्रेक्षकांसाठी नवा नाही. अशा नागिणींबाबत आजवर बरंच काही बोललं गेलं आहे. निर्माता निखिल द्विवेदी हा विषय रुपेरी पडद्यावर आणण्यासाठी उत्सुक असल्याचं कळतंय. या चित्रपटात बॉलिवूडमधली आघाडीची अभिनेत्री असेल अशीही चर्चा आहे. अर्थात या विषयावरचा चित्रपट अद्याप प्राथमिक टप्प्यात आहे. याचं कथानकही ठरलेलं नाही. त्यामुळे या चित्रपटाबाबत आत्ताच काही सांगता येणार नाही. मात्र अशा पद्धतीने इच्छाधारी नागिणीची भूमिका साकारणं अभिनेत्रींसाठीही सोपं नसेल. इच्छाधारी नागिणीची भूमिका साकारण्यासाठी उत्सुक असणाऱ्या अभिनेत्रींच्या यादीत दीपिका पदुकोण, आलिया भट्ट, तारा सुतारिया, कियारा अडवाणी, दिशा पटानी अशी काही नावं आघाडीवर आहेत. दीपिका पदुकोण आणि आलिया भट्ट यांनी आजवरच्या चित्रपटांमधून आपलं अभिनयकौशल्य सिद्ध केलं आहे. या अभिनेत्री वैविध्यपूर्ण भूमिका अगदी सहजपणे साकारू शकतात. कियारा अडवाणीच्या चित्रपटांना चांगलं यश मिळालं आहे. तिच्या चाहत्यांची संख्याही वाढू लागली आहे. दिशा पटानीच्या 'मलंग'मधल्या कामगिरीचं खूप कौतुक झालं. तारा सुतारियानेही पदार्पणात सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. त्यामुळे कोणती अभिनेत्री इच्छाधारी नागिणीची भूमिका साकारणार हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे.




# सेलेब्जचे प्राणीही लय भारी...

**बॉलिवूड सेलिब्रिटींच्या लोकप्रियतेला तोड नाही. बरेच सेलिब्रिटी सोशल मीडियावर सक्रिय आहेत. त्यांच्या फॉलोअर्सची संख्याही प्रचंड आहे. बऱ्याच सेलेब्जनी कुत्रा, मांजरांसारखे प्राणी पाळले आहेत. तेही सोशल मीडियावर लोकप्रिय आहेत. या प्राण्यांचेही बरेच फॉलोअर्स आहेत!**

बऱ्याच सेलिब्रिटींनी प्राणी पाळले आहेत. सेलिब्रिटींप्रमाणे हे प्राणीही सोशल मीडियावर हिट आहेत. या प्राण्यांची सोशल मीडियावर खाती आहेत. त्यांचेही हजारो फॉलोअर्स आहेत. हे गोंडस प्राणी चाहत्यांना नेहमीच भुलवत असतात. प्रियांका चोप्राने कुत्रा पाळला आहे. डायना असं त्याचं नाव आहे. याच नावाने तिचं अकाउंटही आहे. प्रियांका डायनाचे क्यूट फोटो शेअर करत असते. डायना इन्स्टाग्रामवर सक्रीय आहे. इथे तिचे दीढ लाख फॉलोअर्स आहेत. 'डायरीज ऑफ डायना' या हॅशटॅगअंतर्गत तिचे फोटो शेअर होत असतात. जॉन अब्राहमलाही प्राण्यांची खूप आवड आहे. त्याच्याकडे दोन श्वान आहेत. बेली आणि सिआ अशी त्यांची नावं आहेत. जॉनचं या श्वानांवर खूप प्रेम आहे. हे श्वानही जॉनवर प्रेमाची बरसात करत असतात. बेली आणि सिआचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. या श्वानांचे १५ ते २० हजार फॉलोअर्स आहेत. जॉनने कोरोना व्हायरसबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी श्वानांचे मास्क घातलेले फोटो शेअर केले होते. तसंच या फोटोमध्ये सॅनिटायझरही दाखवण्यात आला होता. बेली आणि सिआ यांच्या फोटोंना भरपूर लाईक्स मिळत असतात. दिशा पटानीने चार प्राणी पाळले आहेत. तिच्याकडे दोन कुत्रे आणि दोन मांजरं आहेत. बेला, जस्मिन, गोकू आणि किटी अशी त्यांची नावं आहेत. या चौघांचं मिळून इन्स्टावर खातं आहे. या प्राण्यांचे जवळपास २२ हजार फॉलोअर्स आहेत. दिशा आपल्या या गोतावळ्यासोबतचे फोटो नेहमीच शेअर करत असते. रवीना टंडनकडे ल्युसिफर नावाचा गोंडस कुत्रा आहे. ल्युसिफरचं इन्स्टावर अकाउंट आहे. तिचेही दोन हजार फॉलोअर्स आहेत. आलिया भट्टकडे छानसं मांजर आहे. एडवर्ड भट्ट असं या मांजराचं नाव आहे. एडी भट्ट या नावाने तिचं इन्स्टावर खातं आहे. आलिया एडीचे बरेच फोटो शेअर करत असते. तिच्या फॉलोअर्सही संख्या कमी असली तरी ती हळूहळू वाढेल, अशी अपेक्षा आहे.





# अंगिरा झळकणार आंतरराष्ट्रीय चित्रपटात...

अंगिरा धरने डिजिटल माध्यमाचं महत्त्व कधीच ओळखलं होतं. यशराज फिल्म्सच्या 'बँड, बाजा बारात' आणि नेटफ्लिक्सच्या 'लव्ह पर स्क्वेअर फीट' या वेब सिरिजमध्ये ती झळकली. त्यानंतर तिने 'कमांडो ३' हा चित्रपट केला. अंगिराला 'कमांडो ३' मध्ये ॲक्शन करायची संधी मिळाली. आता तिला आणखी मोठी संधी मिळाली आहे. अनुराग कश्यप 'तल्ख' हा पहिला आंतरराष्ट्रीय चित्रपट करतोय. या चित्रपटात अंगिरा झळकणार आहे. या चित्रपटात काम करण्याची संधी मिळाल्यामुळे ती खूप खूश आहे.

# सेलेब्जही ट्रोलिंगला बळी

**विविध सेलेब्ज रिॲलिटी शोचे परिक्षक म्हणूनही काम बघतात. परिक्षक म्हणून काम करण्याच्या नादात हे सेलेब्ज काही वेळा चुकीचं वागतात, चुकीचं बोलून जातात. मग त्यांना ट्रोलिंगला सामोरं जावं लागतं.**



परिक्षक म्हणून काम करणारे सेलिब्रिटी बरेचदा तारतम्य सोडून वागतात. रिॲलिटी शोमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांबाबत अपशब्द काढतात, चुकीच्या गोष्टींना पाठिंबा देतात, अर्थहीन वक्तव्य करतात. हे सगळं प्रेक्षकांसमोर घडतं आणि सेलिब्रिटी परिक्षकांना ट्रोलिंगला सामोरं जावं लागतं. नेहा धुपियावर सध्या बरीच टीका होत आहे. नेहा सध्या 'रोडिज रेव्हल्यूशन'ची गँग लीडर आहे. 'रोडिज' हा तरुणाईशी संबंधित रिॲलिटी शो आहे. या शोमध्ये नेहाने मुलीच्या चुकीच्या वागण्याचं समर्थन केलं. याच कारणामुळे ती ट्रोल होत आहे. 'बिग बॉस'च्या सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडणाऱ्या सलमान खानवरही बरेचदा टीका झाली. 'बिग बॉस'च्या तेराव्या हंगामात सलमानने स्पर्धकांच्या वैयक्तिक आयुष्यावर भाष्य केलं. टीव्हीसारख्या माध्यमावर अशा पद्धतीने कोणाचं वैयक्तिक आयुष्य चव्हाट्यावर आणणं योग्य नसल्याचं मत प्रेक्षकांनी व्यक्त केलं. याच कारणामुळे सलमानवर बरीच टीका झाली. नेहा कक्कर 'इंडियन आयडॉल'ची परिक्षक म्हणून काम बघते. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांचा संघर्ष ऐकून तिला बरेचदा रडू फुटतं. ती सगळ्यांसमोर अश्रू ढाळते. भावनिक होते. यामुळे प्रेक्षकांनी तिला रडूबाई असं नाव दिलं आहे. आपण भावनिक असल्याचं सांगत नेहानेही ट्रोलर्सना प्रत्युत्तर दिलं. करणने जोहर 'कॉफी विथ करण' या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करतो. या कार्यक्रमात हार्दिक पंड्या आणि के. एल. राहुल हे क्रिकेटपटू सहभागी झाले होते. त्यावेळी या दोघांनी महिलांसंदर्भात चुकीचं वक्तव्य केलं. करणनेही यावर हास्यविनोद केले. याच कारणामुळे करणवर बरीच टीका झाली. शिल्पा शेट्टी 'सुपर डान्सर' या रिॲलिटी शोची परिक्षक होती. त्यावेळी स्पर्धकांचं नृत्य बघितल्यानंतर तिला अश्रू अनावर झाले. या कारणामुळे तिच्यावर बरीच टीका झाली.





# कोरोनामुळे लागला ब्रेक!

**इरफान खानने 'अंग्रेजी मीडियम'मधून रुपेरी पडद्यावर पुनरागमन केलं. या चित्रपटाबद्दल बरीच उत्सुकता होती. चित्रपटाने सकारात्मक सुरूवातही केली. मात्र कोरोना व्हायरसमुळे बऱ्याच ठिकाणची थिएटर्स बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याने अनेक चित्रपटांना गाशा गुंडाळावा लागला.**

इरफान खानच्या 'अंग्रेजी मीडियम'ने पहिल्या दिवशी ४.३ कोटी रुपये कमावले. 'अंग्रेजी मीडियम' पहिल्या दिवशी तीन कोटी रुपयांच्या आसपास कमाई करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. मात्र चित्रपटाने त्यापेक्षा थोडी चांगली कामगिरी केली. 'अंग्रेजी मीडियम'सारख्या चित्रपटाकडून धडाकेबाज सुरूवातीची अपेक्षा कधीच नव्हती. 'माउथ पब्लिसिटी' चित्रपटाला तारणार यात कोणतीही शंका नव्हती. समिक्षकांकडून 'अंग्रेजी मीडियम'ला संमिश्र प्रतिसाद मिळाला. मात्र चित्रपटाचा ट्रेलर फार कमाल करू शकला नाही. 'अंग्रेजी मीडियम'मध्ये काही वेगळं पहायला मिळेल, असं ट्रेलरवरून तरी वाटलं नाही. हा चित्रपट 'हिंदी मीडियम'ची उंचीही गाठू शकला नाही. दुसरीकडे कोरोना व्हायरसचा फटकाही चित्रपटाला बसला. अनेक शहरांमध्ये थिएटर्स, मॉल्स बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसंच प्रेक्षकांनीही गर्दीच्या ठिकाणी जाणं टाळल्यामुळे चित्रपटाच्या कमाईत घट झाल्याचं ट्रेडगुरूंचं म्हणणं आहे. सरत्या आठवड्यातल्या शनिवारी चित्रपटाने तीन कोटी रुपये कमावले. थिएटर्स बंद ठेवण्यात आल्यामुळे 'अंग्रेजी मीडियम'चं बरंच नुकसान झालं. त्यातच हा चित्रपट 'हिंदी मीडियम'प्रमाणे मनोरंजन करण्यात अपयशी ठरत असल्याचं मतही व्यक्त करण्यात आलं. थिएटर्स सुरू असती तर 'अंग्रेजी मीडियम'च्या कमाईत अधिक भर पडली असती. 'अंग्रेजी मीडियम'ने दोन दिवसात ७.३ कोटी रुपये कमावले. कोरोना व्हायरसमुळे 'अंग्रेजी मीडियम'च्या कमाईला ब्रेक लागण्याची शक्यता आहे. तिकडे 'बागी ३'ने ९४.९२ कोटी रुपयांची कमाई केली आहे. मधल्या काळात 'बागी ३' ने आमीर खानचा 'तलाश' आणि कार्तिक आर्यनचा 'लुकाछुपी' या चित्रपटांना कमाईच्या बाबतीत मागे टाकलं. 'शुभमंगल ज्यादा सावधान'चा प्रवासही आता थांबण्याच्या मार्गावर आहे. चित्रपटाने ६२.५० कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. तापसी पन्नूच्या 'थप्पड'नेही ३२ कोटी रुपये कमावले आहेत. सरत्या आठवड्यातल्या शुक्रवारी चित्रपटाने २५ लाख रुपये कमावले. 'थप्पड'लाही आता गाशा गुंडाळावा लागणार आहे. कोरोना व्हायरसमुळे बऱ्याच चित्रपटांना नुकसान सहन करावं लागणार आहे.

# 'डार्लिंग' रितिका

**मराठीतही सातत्याने नव्या अभिनेत्रींची एंट्री होत आहे. 'टकाटक'या चित्रपटातून रितिका श्रोत्रीने रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं. आता तिचा नवा चित्रपट चर्चेत आहे.**

हिंदीमध्ये नेहमीच नवनव्या अभिनेत्रींची एंट्री होत असते. काही अभिनेत्री छाप पाडण्यात यशस्वी ठरतात तर काहींना संघर्ष करावा लागतो. गेल्या वर्षी 'टकाटक' या चित्रपटातून रितिका श्रोत्रीने रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं होतं. रितिकाच्या अभिनयाचं बरंच कौतुक झालं. हा चित्रपटही चांगलाच गाजला. रितिकाच्या रुपाने आणि अभिनयकौशल्याने प्रेक्षकही प्रभावित झाले. मधल्या काळात रितिका रुपेरी पडद्यावर फारशी दिसली नव्हती. पण आता ती 'डार्लिंग'मधून रुपेरी पडद्यावर येणार आहे. मध्यंतरी या चित्रपटाची अधिकृत घोषणा करण्यात आली. समीर पाटील या चित्रपटाचं दिग्दर्शन करणार आहे. 'डार्लिंग'च्या निमित्ताने रितिकाला आणखी एक आव्हानात्मक भूमिका मिळाली आहे. आता ही भूमिका रितिका कशी निभावणार हे पाहण्याची उत्सुकता चाहत्यांना लागून राहिली आहे. समीर पाटीलने 'चौर्य', 'यंटम' आणि 'वाघेऱ्या'सारख्या चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. या चित्रपटाला चिनार-महेश यांचं संगीत असेल. 'डार्लिंग'मधल्या इतर कलाकारांची नावं अद्याप घोषित झालेली नाहीत. 'टकाटक'मध्ये रितिकाचे लटकेझटके बघायला मिळाले होते. आता 'डार्लिंग'मध्येही असंच काही तरी बघायला मिळेल अशी अपेक्षा आहे. या चित्रपटाचं मोशन पोस्टर प्रदर्शित झालं आहे. या पोस्टरला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. 'डार्लिंग' प्रदर्शित झाल्यानंतर आपण प्रेक्षकांची डार्लिंग होऊ, अशी आशा रितिकाला वाटत असल्यास नवल नाही.





# मीराने घेतलं घर

'सेक्शन ३७५' मध्ये झळकलेल्या मीरा चोप्राने मुंबईत घर घेतलं आहे. मुंबईत घर घेणं हे अनेकांचं स्वप्न असतं. मुंबई हे स्वप्नांचं शहर. मीरा या शहरात घर घेण्यासाठी प्रयत्नशील होती. जवळपास दोन वर्षं ती घराचा शोध घेत होती. दोन वर्षं संघर्ष केल्यानंतर मीराला स्वप्नातलं घर मिळालं. मीराने मुंबईतल्या लोखंडवालामध्ये तीन बीएचकेचा फ्लॅट घेतला आहे. तिला हे घर वेगळ्या पद्धतीने सजवायचं आहे.

# ...म्हणून दीपिकाने दिला नकार



सध्या 'गंगूबाई काठियावाडी' या चित्रपटाची चर्चा आहे. या चित्रपटात आलिया भट्ट प्रमुख भूमिकेत आहे. 'गंगूबाई काठियावाडी' हा संजय लीला भन्साळीचा चित्रपट आहे. संजयने नेहमीच दीपिका पदुकोणला पसंती दिली आहे. मात्र 'गंगूबाई'मध्ये दीपिका नसल्यामुळे चाहत्यांना धक्का बसला होता. पण संजयला गंगूबाईमध्ये दीपिकाला घ्यायचं होतं. मात्र विशाल भारद्वाजच्या 'सपना दीदी' या चित्रपटात दीपिका गँगस्टरची भूमिका साकारत आहे. गंगूबाईची भूमिकाही त्याच धाटणीची आहे. त्यामुळे दीपिकाला एकाच प्रकारच्या भूमिका करायच्या नव्हत्या. याच कारणामुळे तिने गंगूबाई करायला नकार दिल्याची बाब समोर आली आहे.



# आरोग्य विम्याचा अभ्यास करताना...

**आरोग्य विमा ही सध्याच्या काळाची गरज असून वयोमानानुसार हप्त्यात वाढ होत असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करणं महागात पडू शकतं. जीवनमान वाढल्यामुळे औषधोपचारांसाठी जादा खर्च करावा लागत असल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्य विमा घेतलाच पाहिजे. यामुळे आर्थिक आणि पर्यायानं कुटुंबाचं स्वास्थ्य टिकून राहू शकतं. हा विमा घेताना घ्यावयाची काळजी आणि नेमक्या कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी.**



अर्थवेध

एक एप्रिलपासून आरोग्य संजीवनी पॉलिसीची अंमलबजावणी सुरू होत असल्यानं भारतातलं आरोग्य विम्याचं चित्र बरंचसं बदलण्याची शक्यता आहे. मात्र मोठ्या शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांचा विचार केला तर ज्येष्ठ नागरिकांची गरज या योजनेतून पूर्ण होणं कठीण आहे. शिवाय हा विमा फक्त ६५ वर्षांपर्यंत वय असलेल्या व्यक्तींनाच घेता येणार असे आणि त्यातून फक्त पाच लाखांचं कव्हर मिळणार असल्याने आरोग्यविषयक संरक्षण अपुरं आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसाठी अन्य आरोग्य विमा योजनांचा पर्याय पाहणं आवश्यक ठरतं. त्यासाठी अर्थातच आतापासून १० ते १५ वर्षांपर्यंतच्या हप्त्यांचा एकूण खर्च किती होतो याचा हिशेब केला पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांचं वय ५५ च्या पुढे असेल तर सर्वसामान्यपणे इतर आरोग्य विम्यांमध्ये पाच लाख रुपये फ्लोटिंग कव्हरसाठी सरासरी ३५ हजारांपर्यंतचा हप्ता बसतो. याचा अर्थ १० वर्षांमध्ये तुम्ही किमान साडेतीन लाख रुपये प्रिमियम अदा करता. वय वाढत जाईल तसा हा हप्ताही वाढत जातो. अर्थातच कव्हरमध्येही प्रत्येक कंपनीच्या नियमानुसार काही टक्क्यांची वाढ होत जाते. यात जोडीदार आणि सहसा २१ वर्षांच्या आतल्या व्यक्तीचा समावेश होतो. त्यामुळे मिळणारं एकूण कव्हर आणि तुम्ही भरणार असलेल्या हप्त्यांची रक्कम यांचा योग्य ताळमेळ बसतो का ते पहायला हवं.

आरोग्य विमा घेताना आणखी एक महत्त्वाची बाब लक्षात घेतलीच पाहिजे. ती म्हणजे रुग्णालयात किमान २४ तास रहावं लागलं नाही तर बहुतेक आरोग्य विमा कंपन्यांकडून रुग्णाला खर्चाची रक्कम दिली जात नाही. तसंच वर्षभरात रकमेची गरज पडली नाही, तर भरलेल्या हप्त्याला एकही रुपया परत मिळत नाही. या सर्व बाबींचा विचार करून विविध कंपन्यांच्या आरोग्य विम्याच्या अटींची तुलना करून कंपनीची निवड करावी. तसंच क्लेम दिले गेल्याचं प्रमाण तपासणंही अत्यावश्यक असतं. याखेरीज संबंधित विम्यात कॅशलेस सुविधा आहे का की सुरुवातीला आपण पैसे भरावे लागणार आहेत आणि नंतर कंपनीकडून ते दिले जाणार आहेत हे ही तपासलं पाहिजे. काही विमा कंपन्या ठरावीक रुग्णालयात उपचार घेतले गेले तरच विम्याची रक्कम देतात. या सगळ्या बाबी पॉलिसी घेण्याआधीच विचारात घेतल्या गेल्या पाहिजेत. तसंच घेतलेली पॉलिसी किती दिवसांनी लागू होते तो कालावधी आणि आधीचे आजार असतील तर किती दिवसांनी खर्च मिळू शकतो या बाबीही समजून घेतल्या पाहिजेत.

काही विमा कंपन्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी डेडिकेटेड प्लॅन आणले आहेत. पण सध्या तरी त्यांचे हप्ते एवढे उच्च आहेत की नियमित प्लॅन घेणंच परवडू शकतं. उदाहरणार्थ, रेलिगेअर हेल्थ इन्शुरन्स कंपनीकडून ६५ वर्षांच्या व्यक्तीला २५,८२८ रुपये, स्टार हेल्थ कंपनीकडून २६,५५० रुपये आणि आदित्य बिर्ला हेल्थकडून ३०,८८८ रुपये एवढा हप्ता आकारला जातो. इतर कंपन्यांचेही दरही अशाच प्रमाणात आहेत. शिवाय या ज्येष्ठ नागरिक-विशिष्ट योजनांमध्ये नियमित योजनांच्या तुलनेत बंधनंही अधिक असतात. नियमित योजना कंपन्यांनाही अधिक परवडणाऱ्या असतात. कारण सहसा या योजनांमध्ये तरुण लोकही सहभागी झालेले असतात आणि त्यांच्याकडून क्लेम केले जाण्याची शक्यता कमी असते. तरीही अंडररायटिंग स्टँडर्ड उच्चतर असल्यामुळे नियमित योजना घेण्याकडे लोकांचा कल कमी असल्याचं दिसतं. पण असं न करता नियमित योजना घेणं फायद्याचं ठरतं. हप्ता कमी बसावा यासाठी को-पेमेंटचा पर्याय निवडणं फायदेशीर ठरतं. अशी पॉलिसी ही विमाधारक आणि कंपनी या दोहोंसाठीही लाभदायक ठरते. आरोग्य संजीवनी पॉलिसी ही सर्व वयोगटांसाठी पाच टक्के को-पेमध्ये मिळते. मात्र हप्ता कमी बसत असला तरी तुमच्याकडच्या पैशांच्या तरलतेकडे दुर्लक्ष करणं योग्य ठरत नाही. तुम्हाला खर्चाच्या २० टक्के रक्कम भरणं परवडू शकत असेल तरच हा पर्याय निवडा.

मूळ कव्हर तसंच ठेवायचं की गंभीर आजारांचा रायडर जोडायचा हा प्रश्नही असाच महत्त्वाचा असतो. काही झालं तरी खिशावर गंभीर आजारांचा मोठाच ताण पडतो. पाच लाखांचं नियमित कव्हर आणि दहा लाखांचं गंभीर आजारांचं कव्हर एकत्रितपणे घेतलं तर ते अधिक स्वस्त पडतं. पण यातही एक गोची असते. गंभीर आजारांची व्याख्या करण्यात आलेली असते आणि त्या यादीतल्या आजारांव्यतिरिक्तचे आजार अतिरिक्त विमा संरक्षण मिळवण्यास पात्र ठरवले जात नाहीत. यात आणखी एक पर्याय असतो. तो म्हणजे तुम्ही फक्त गंभीर आजारांसाठी कव्हर घेऊ शकता. इथे क्लेमसाठी पैसे दिले जाण्याची यंत्रणा वेगळी असते. त्यायोगे विशिष्ट आजारपण झाल्यानं निदान झालं की त्या आजाराच्या निदानापोटी निश्चित करण्यात आलेली ठरावीक रक्कम एकरकमी दिली जाते आणि ही रक्कम प्रत्यक्ष उपचाराच्या खर्चाच्या रकमेशी संबंधित नसते.

आरोग्य विम्याचा हप्ता कमी करण्याचा आणखी एक मार्ग म्हणून मूळ आरोग्य विमा संरक्षण सोडून देऊन फक्त सुपर टॉप अप प्लॅनचा विचार केला जातो. पण टॉप अप आणि सुपर टॉप अप प्लॅन यांच्यातला फरक लक्षात घेतला पाहिजे. टॉप अप प्लॅनमध्ये रुग्णालयाचं बिल हे दिल्या जाणाऱ्या वजावटीच्या मर्यादेत रकमेपेक्षा अधिक असावं लागतं. सुपर टॉप अपमध्ये पॉलिसी किती वर्षे घेतली गेली आहे यावर ही मर्यादा ठरवली जाते. उदाहरणार्थ, तुम्ही पाच लाख रुपये वजावटीच्या मर्यादेची पॉलिसी घेतली असेल आणि तुमचं त्या वर्षीचं वैद्यकीय खर्चाचं बिल आठ लाख रुपये असेल आणि तुम्हाला चार वेळा रुग्णालयात दाखल झाल्यावर ते भरावं लागलेलं एकूण बिल असेल तर हे बिल प्रत्येकी दोन लाख रुपयांचं धरलं जातं आणि ते पाच लाखांहून कमी असल्यामुळे तुम्हाला एक रुपयाही भरपाई मिळत नाही. पण सुपर टॉप अप प्लॅनमध्ये तुम्ही वजावटीची रक्कम कमी म्हणजे समजा, वार्षिक एक लाख रुपये ठेवली तर वर्षभरातली सुरुवातीची एक लाखांची रक्कम तुम्हाला भरावी लागते. पण इतर रक्कम कंपनीकडून दिली जाते. को पेमेंटप्रमाणेच इथेही तुम्ही वैद्यकीय बिलाचा काही भाग स्वतः भरण्याचं मान्य केलेलं असतं आणि त्या बदल्यात हप्ता कमी करून घेतलेला असतो. मात्र बहुतांश कंपन्या अधिक रकमेच्या विमा सुरक्षेसाठी कमी वजावटीत उच्च टॉप अप देऊ करत नाहीत. बहुतांश कंपन्या फक्त पाच लाखांच्या विमा संरक्षणासाठी एक लाखापर्यंतची वजावट देऊ करतात. पण तेच संरक्षण २५ लाखांचं असेल तर त्यासाठी पाच लाखांची वजावट असावीच लागते. कमावत्या व्यक्तीने घेतलेल्या फॅमिली फ्लोटरमध्ये पालकांचाही समावेश असेल तर ते अधिक चांगलं ठरतं. शिवाय नोकरीच्या ठिकाणी मालकही काही वेळा विमा संरक्षण पुरवतो. काही वेळा ते फक्त कर्मचाऱ्यांपुरतंच असतं तर काही कंपन्या त्यात पालकांचाही समावेश करतात. इतर काही कंपन्या ठरावीक हप्ता कापून घेऊन पालकांचा समावेश करतात. ही बाब चांगली असली तरी नोकरीची निश्चिती असेल तरच हे चांगलं ठरतं. तुम्ही एकदा कंपनी सोडली की कॉर्पोरेट विमा संरक्षणही संपतं. निवृत्तीच्या दरम्यान नवीन पॉलिसी घेण्याऐवजी कंपनीची पॉलिसीच आपल्या नावार हस्तांतरित करून घेता येते. आरोग्याच्या समस्या नसतील तर हे हस्तांतरण सुलभपणे होतं, अन्यथा ते होत नाही. त्यामुळे शक्यतो कंपनीच्या विम्याबरोबरच स्वतंत्र आरोग्य विमा घेणं आवश्यक असतं आणि कंपनीला पैसे देऊन पालकांचा विमा उतरवण्यापेक्षा त्यांचा स्वतंत्र आरोग्य विमा घेणंही योग्य ठरतं. वैद्यकीय विम्यामुळे करकपातही मिळते. मात्र त्याचा लाभ घेण्याविषयी अनेकजण अनभिज्ञ असतात. कर सल्लागारांच्या सहाय्यानं याची माहिती घेऊन ज्येष्ठ नागरिकांचा आरोग्य विमा घेतला तर रुग्णालयामध्ये करावा लागणारा मोठा खर्च टळू शकतो.

### वैद्यकीय विमा टाळू नका

वैद्यकीय विम्याचा हप्ता वाढत चालला की अनेक लोकांना तीच रक्कम वैद्यकीय फंड म्हणून साठवण्याचा मोह होतो. मात्र अशा प्रकारे जमा करण्यात आलेली रक्कम अपुरी असल्यामुळे गंभीर आजारपणात एखाद्या वर्षातच खर्च होऊन जाते. त्यामुळे वैद्यकीय विमा घेऊनही वैद्यकीय खर्चासाठी तरतूद करण्याचा सल्ला दिला जातो. कारण आरोग्य विम्यातूनही सगळाच खर्च दिला जात नाही. उदा. बहुतांश पॉलिसी ओपीडीचा खर्च देत नाहीत. तरुण विमाधारकांना क्वचित सगळा खर्च दिला जातोही, पण ज्येष्ठ नागरिकांना अनेक वगळणुकींना आणि को-पेमेंटमधल्या बंधनांना तोंड द्यावं लागतं.


## हिंदुस्थान वलयांकित

movie CLUB

ऑटो वर्ल्ड

### मंदीतही किया मोटर्सची चांदी

वाहन उद्योगात मंदीचे वारे वाहत असताना 'किया मोटर्स'च्या 'सेल्टॉस'ला ग्राहकांच्या पसंतीची पावती मिळत असल्याचं दिसून येत आहे. या वर्षी सलग दुसऱ्या महिन्यात 'सेल्टॉस'ची सर्वाधिक विक्री झाली आहे. यामुळे सेल्टॉस ही सर्वाधिक विक्री होणारी एसयूव्ही ठरली आहे. फेब्रुवारी महिन्यात 'किया मोटर्स'च्या १५,६४४ गाड्यांची विक्री झाल्यामुळे ही कंपनी देशातली तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी वाहन उत्पादक कंपनी ठरली आहे. जानेवारीमध्ये १४,०२४ सेल्टॉस गाड्यांची विक्री करण्यात किया मोटर्सला यश आलं होतं. जानेवारीच्या तुलनेत फेब्रुवारी महिन्यात प्रवासी वाहनांच्या विक्रीत ४.४ टक्के घट झाल्याचं दिसून आलं. मात्र 'किया मोटर्स'च्या वाहनांची विक्री १.३ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली. त्यामुळे किया मोटर्सने विविध वाहन उत्पादक कंपन्यांसमोर आव्हान उभं केलं आहे.



म्युच्युअल फंड

### ईएलएसएसमध्ये गुंतवणूक करावी का?

नव्या कररचनेत करदात्यांना आयकर कायद्याअंतर्गत मिळणाऱ्या वजावटी तसंच सवलतींचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे या कररचनेची निवड करणाऱ्या करदात्यांकडे बरीच अतिरिक्त रक्कम शिल्लक राहील. आता ही रक्कम कुठे आणि कशी गुंतवायची असा प्रश्न करदात्यांना पडू लागला आहे. बरेच गुंतवणूकदार करबचत साधणाऱ्या म्युच्युअल फंडांमध्ये म्हणजेच इक्विटी लिंक्ड म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करतात. अशा वेळी या फंडांमध्ये गुंतवणूक करण्याचा काही अर्थ उरतो का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. नोकरदार वर्ग भविष्य निर्वाह निधीमध्ये गुंतवणूक करत असतो. त्यामुळे या व्यतिरिक्त इक्विटी गुंतवणुकीचा पर्याय म्हणून ईएलएसएसची निवड करता येईल. ईएलएसएसमध्ये गुंतवणूक केल्यानंतर तीन वर्षांचा लॉक इन कालावधी असतो. हा कालावधी पूर्ण होईपर्यंत पैसे काढता येत नसल्यामुळे गुंतवणूक सुरक्षित राहते. तसंच कर भरताना वजावटीचे लाभ मिळाले नाहीत तरी ईएलएसएसमधल्या गुंतवणुकीचे इतर अनेक लाभ आहेत. दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांसाठी गुंतवणूक करायची असेल तर ईएलएसएस हा उत्तम पर्याय ठरू शकतो.




कर्ज घेताय?

### हप्ता वाढवा, कर्जाचा बोजा कमी करा

गृह कर्जाचा कालावधी सर्वसाधारणपणे १५ ते २० वर्षांचा असतो. एवढा प्रदीर्घ कालावधी कर्ज फेडण्यात जातो. कर्जाचा कालावधी अधिक असेल तर व्याजही अधिक भरावं लागतं. म्हणूनच हप्त्याची रक्कम वाढवून कर्जाचा कालावधी कमी केल्यास बरेच लाभ मिळू शकतात. त्यातही व्याजदर कमी होण्याच्या परिस्थितीत कालावधी कमी करण्याचे बरेच लाभ मिळतात. हप्त्याच्या रकमेत झालेली किरकोळ वाढही बरंच काही देऊ जाते. हप्त्याची रक्कम दोन हजार रुपयांनी वाढवली तरी कर्जाचा कालावधी कमी होऊ शकतो. भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपो दरांमध्ये कपात केल्यावर व्याजदरांमध्येही मोठी घट होते. व्याजदर कमी होण्याचा हा काळ कर्जाचा बोजा कमी करण्याच्या दृष्टीने अगदी योग्य काळ असतो, असं तज्ज्ञांचं मत आहे.




रिअॅल्टी

### मागणी घटली, किंमती राहिल्या स्थिर

देशभरातल्या प्रमुख मालमत्ता बाजारपेठांमधल्या मालमत्तांच्या किंमतीमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये किरकोळ वाढ झाल्याचं दिसून येत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये मागणी घटल्यामुळे मालमत्तेच्या किंमती बऱ्यापैकी स्थिर राहिल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. मार्च २०१५ ते २०२० या काळात हैदराबादमधल्या मालमत्तेच्या किमतीमध्ये सर्वाधिक वाढ झाली. त्यानंतर मुंबई आणि बंगळूरमधल्या मालमत्तेच्या किंमतींमधली वाढ लक्षवेधी ठरली. याच पाच वर्षांच्या कालावधीत नोएडा आणि गुरुग्राममधल्या मालमत्तेच्या किंमतीत घट झाली आहे. या काळात गुरुग्राममधल्या किंमतीत सात टक्क्यांनी तर नोएडामधल्या मालमत्तेच्या किंमतीत चार टक्क्यांनी घट झाल्याचं पहायला मिळालं. या बाजारपेठांमधल्या मालमत्ता प्रकल्पांना बराच वेळ लागत असल्याचं चित्र गेल्या काही वर्षांमध्ये निर्माण झालं आहे. तसंच काही मोठे बांधकाम व्यावसायिक तोट्यात गेल्यामुळे इथल्या मालमत्ता क्षेत्राबाबत नकारात्मक वातावरण निर्माण झालं आहे.



# व्यापार करारातलं 'संरक्षण'

लक्षवेधी

ट्रम्प यांच्या भेटीमुळे भारताला काय लाभ झाला याबाबत चर्चा करायची झालीच तर अमेरिकेकडून भारताला मिळणाऱ्या संरक्षणविषयक मदतीपेक्षा पाकिस्तानला कोणतीही जादा लष्करी मदत मिळत नसल्याची बाब आपल्या दृष्टीने अधिक महत्त्वाची आहे. अमेरिकेने पाकिस्तानला अद्ययावत संरक्षण सामुग्री देणं बंद केलं आहे. त्यामुळे भारताने संरक्षणाच्या क्षेत्रात आपलं वर्चस्व निर्माण केलं आहे. हे वर्चस्व निर्माण करण्यात आणि टिकवून ठेवण्यात अमेरिकेचाही मोठा वाटा आहे. पाकिस्तानला मिळालेल्या शस्त्रास्त्रांचा वापर भारताविरोधात होणार हे निश्चित होतं. त्यामुळे पाकिस्तानला दिलेली शस्त्रास्त्रं फक्त दहशतवाद्यांविरोधात वापरली



जातील, या मताला तसा काही अर्थ नाही. अमेरिकेने चीनचा मुकाबला करण्यासाठी भारताला विकलेल्या अद्ययावत शस्त्रास्त्रांचा वापर पाकिस्तानी सीमेवरही केला जातो आणि यापुढेही केला जाईल. ही बाब आपल्या दृष्टीने महत्त्वाची आहे. अमेरिकाही हे जाणून आहे. ट्रम्प आणि मोदी यांच्यात झालेल्या संरक्षणविषयक चर्चेनुसार अमेरिका भारताला २४ सी हॉक हेलिकॉप्टर्स, ६ एच ६ ई अपाचे हेलिकॉप्टर्स ड्रोन्स, अंतराळातले उपग्रह अशी सामुग्री देऊ शकते. सी हॉक हेलिकॉप्टर्स पाणबुडी शोधण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. या हेलिकॉप्टर्समुळे नौदलाची क्षमता वाढू शकेल. सी हॉक आणि अपाचेसारखी हेलिकॉप्टर्स अफगाणिस्तानमध्ये तालिबानच्या विरोधातही वापरण्यात आली होती. ही हेलिकॉप्टर्स अफगाणिस्तानमधून अमेरिकेत परत घेऊन जाण्याऐवजी अमेरिका भारताला कमी किंमतीत देऊ करण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे अफगाणिस्तानमध्ये वापरण्यात आलेली हेलिकॉप्टर्स भारतात आल्यास अजिबात आश्चर्य वाटू नये. ही सगळी शस्त्रास्त्रं आणि हेलिकॉप्टर्स अमेरिकेला घेऊन जाण्याचा खर्च बघता त्यांची विल्हेवाट लावणं किंवा ठेवण्याची जवळपास व्यवस्था करणं अमेरिकेच्या दृष्टीने अधिक लाभदायी ठरू शकतं. अर्थात यात चुकीचं काहीच नाही. कारण हेलिकॉप्टरचं इंजिन बदलल्यावर ती अगदी नवी होऊन जातात. संरक्षण व्यवहारांमध्ये सामान्यजनांना चकित करणारे निर्णय असू शकतात हे असो...

# प्राप्तीकराला पर्याय...

कर रचना




समाजात अनेजण करांना कंटाळलेले दिसतात. सरकारी कररचना पटत नसल्याने त्यांचा या पध्दतीवरच रोष असतो. काहीजण कर देणाऱ्यांपेक्षा कर भरण्याची गरज नसणाऱ्यांची संख्या प्रचंड असल्यामुळे नाराज असतात. फुकट्यांचा भार आम्ही का वहायचा, असा त्यांचा सवाल असतो. परिणामी, कररचना, करसंकलन, त्यातल्या त्रुटी हे विषय अनेकांच्या चर्चेत आढळतात. कर देणं आणि कर घेणं, ही अपरिहार्य प्रक्रिया आहे, याविषयी दुमत असू शकत नाही. करांपासून आपली सुटका नाही, कारण त्या निधीवरच देश चालतो आणि आपण त्याचे लाभधारक आहोत. पण ही प्रक्रिया अतिशय सुलभ आणि सुटसुटीत केली तर सर्वांनाच हवी आहे. काही देशांमध्ये आर्थिक व्यवहारांवर विशिष्ट कर लावून ही प्रक्रिया सुलभ करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. ही प्रक्रिया अगदी सोपी करण्याचा प्रस्ताव देशासमोर आहे. या पद्धतीचं नाव आहे बँक व्यवहार कर. ही पद्धत सध्याच्या करपद्धतीतले सर्व दोष काढून टाकेल पण सरकारच्या तिजोरीत चांगला महसूलही जमा करू शकेल. ही पध्दत मान्य केली की बँक व्यवहार कर हा एकमेव कर नागरिकांच्या आयुष्यात असेल. बँकेतून ज्याच्या नावे आणि जेवढे पैसे क्रेडीट होतील, त्याच्याकडून एक किंवा दोन टक्के कर आपोआप कापला जाईल. या कराचं त्याच क्षणी केंद्र, राज्य, स्थानिक स्वराज्य संस्था असं विभाजन होऊन संबंधित रक्कम त्या त्या संस्थांच्या खात्यात जमा होईल. बँकींगच्या माध्यमातून क्रेडीट हिस्ट्री तयार होणार असल्याने आणि इतर कोणत्याही कराचा भार नसल्याने करदात्याला त्याचं ओझंही वाटणार नाही. या पध्दतीमुळे विनाकारण वाढलेल्या कर भरण्याच्या गुंतागुंतीपासून नागरिकांची सुटका होईल. हा कर प्रमाणबद्ध असल्याने भेदभाव होणार नाही. जेवढा व्यवहार होईल, त्या प्रमाणातच कर लागेल. या प्रक्रियेमुळे देशातला प्रत्येक नागरिक स्वाभिमानी करदाता होऊ शकेल. देशाला पडणारी अधिक कराची गरज अगदी छोट्या बदलाने भागवता येईल. अर्थातच अशा प्रकारचा बदल अंमलात आणण्यापुर्वी देशव्यापी चर्चा घडवून आणावी लागेल. त्याचे फायदे आणि तोटे समजून घ्यावे लागतील.

# विमानतळ उभारणीत परकियांची भाऊगर्दी

एविएशन

भारतात अलीकडच्या काही वर्षांमध्ये विमान वाहतुकीचं क्षेत्र प्रचंड गतीने वाढतं आहे. आणखी पाच वर्षांमध्ये भारतातली विमान वाहतूक जगातली तिसऱ्या क्रमांकाची असेल. इंटरनॅशनल एअरपोर्ट ट्रान्सपोर्ट असोसिएशननेच तसा अहवाल दिला आहे. स्वीडन झुरिच एअरपोर्ट कंपनीनं दिल्लीजवळच्या जेवार विमानतळ विकासाचं काम मिळवलं, तेव्हा स्पर्धक कंपन्यांची संख्या कमी नव्हती. अदानी समूहासह अन्य पाच-सहा मोठे स्पर्धक काम मिळवण्याच्या स्पर्धेत होते. तरीही स्वीडन झुरिच एअरपोर्ट आणि जीएमआर या कंपनीने भागीदारीत ते काम मिळवलं. जेवार विमानतळ दिल्ली विमानतळाचा ताण कमी करण्यासाठी उपयुक्त ठरेल. बंगळुरुच्या विमानतळाचं काम कॅनडास्थित प्रेम वात्सा यांच्या फेअरफॅक्स इंडिया होल्डींग कार्पोरेशन या कंपनीनं तीन वर्षांपूर्वीच मिळवलं. इक्रा नावाच्या एका संस्थेने भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात म्हणजेच प्रवासी वाहतुकीत साडेचार टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे, असं म्हटलं आहे. मंदी असतानाच्या काळात विमान वाहतूक क्षेत्राला फटका बसलेला नाही, हे ही आकडेवारी स्पष्ट करते. अर्थात गेल्या सहा वर्षांच्या तुलनेत विमान वाहतुकीच्या क्षेत्रातली वाढ कमीच आहे. विमानाच्या तिकिटांच्या दरात पूर्वीच्या तुलनेत बऱ्यापैकी कपात झाल्यानं आणि विमानांच्या फेऱ्यांची संख्या वाढल्यानं आता प्रवाशांनी विमान वाहतुकीला प्राधान्य दिलं आहे. विमानतळ विकासाची कामं करणाऱ्या वेगवेगळ्या संस्था आता परस्परांना प्रतिस्पर्धी मानत नाहीत. त्या हातात हात घालून भागीदारीत गुंतवणूक करतात. अहमदाबाद, गोवा, नागपूर, मुंबई, दिल्ली या गर्दीच्या विमानतळांच्या विकासासाठी आज अनेक कंपन्या गुंतवणूक करायला तयार आहेत. त्या तुलनेत मंगळूरसारख्या विमानतळाच्या विकासात कुणालाच रस नाही. गुंतवणूकदार आपली गुंतवणूक किती काळात परत मिळेल, याचा विचार करत असतात. भारताने आता विमानतळ विकासातही शंभर टक्के गुंतवणुकीला परवानगी दिली असली, तरी परदेशी कंपन्या अजूनही भारतीय भागीदारांसोबत करार करून गुंतवणुकीला प्राधान्य देत आहेत. भारतातल्या सध्याच्या विमानतळांची संख्या, पन्नास वर्षांची जबाबदारी लक्षात घेता आता आणखी काही कंपन्या अन्य निविदांमध्ये सहभागी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.



## संत्र्याचा पॅनकेक



रसगंधा

विविध प्रकारचे पॅनकेक बनवले जातात. तुम्ही संत्र्याचा पॅनकेक करून बघा. हा पॅनकेक एखाद्या विशेष प्रसंगाची शान ठरू शकेल.

**साहित्य :** अर्धा कप संत्र्याचा रस, अर्धा कप मैदा, अर्धा कप कॉर्न फ्लोर, चमचाभर बटर, एक चमचा साखर आणि चिमूटभर मीठ.


टॉपिंगसाठी : व्हॅनिला आईस्क्रीम आणि मध

**कृती :** एका भांड्यात अर्धा कप पाणी घ्या. त्यात मैदा, कॉर्न फ्लोर, संत्र्याचा रस, साखर आणि मीठ घालून सगळे घटक मिसळून घ्या. पॅनकेकचं बॅटर तयार करून घ्या. आता नॉनस्टिक तवा किंवा पॅन घ्या. त्यावर बटर घाला. आता कपमध्ये किंवा गोलाकार डावात बॅटर घ्या. तव्यावर घालून पसरून घ्या. पॅनकेक फार पातळ नसावा. बाजूने थोडं बटर सोडा. आता एक बाजू भाजून घ्या. मग पॅनकेक उलटून दुसरी बाजू भाजून घ्या. अशा पद्धतीने सगळे पॅनकेक तयार करा. आता एका प्लेटमध्ये पॅनकेक ठेवा. त्यावर व्हॅनिला आईस्क्रीमचा गोळा आणि मध घाला. डेझर्ट म्हणून खायला द्या.

हेअर केअर

### गुणकारी शिकेकाई

रिठा आणि शिकेकाईच्या वापरामुळे केस छान मुलायम होतील. शिवाय केसांशी संबंधित विविध समस्या दूर करता येतील. केसांच्या पोषणासाठी शिकेकाई वाटून पूड करून घ्या. बाजारातली शिकेकाईची पूडही विकत घेता येईल. ही पूड खोबरेल तेलात घाला. हे मिश्रण पंधरा दिवस एखाद्या थंड जागी ठेवा. या मिश्रणाने आठवड्यातून दोन वेळा केसांना मसाज करा. यामुळे केस छान बळकट होतील.



ग्रूमिंग

### कोणत्या आय ब्रो दिसतील छान?

भुवयांचा आकार चेहऱ्यानुसार असायला हवा. यामुळे तुमचा चेहरा उठून दिसेल. चेहरा चौकोनी असेल तर आय ब्रो गोलाकार किंवा धनुष्याकृती असायला हव्यात. गोल चेहऱ्याच्या महिलांनी उभट आय ब्रो करणं योग्य ठरतं. लांबुळका चेहरा असेल तर आय ब्रो फार लांब ठेऊ नका. छोट्या चेहऱ्याच्या महिलांच्या भुवयांमध्ये अधिक अंतर असणं चांगलं असतं. यामुळे तुमचा चेहरा खुलून दिसतो. चेहरा अंडाकृती असेल तर भुवयांना उभार द्यायला विसरू नका.



उपयुक्त टिप्स

### घरीच बनवा वॅक्स

हाता-पायांवरची लव काढून टाकण्यासाठी वॅक्सिंग केलं जातं. मात्र बाहेरच्या वॅक्सिंगमुळे तुम्हाला त्रास होऊ शकतो. म्हणूनच घरी मिल्क वॅक्स तयार करता येईल. हे वॅक्स तयार करण्यासाठी अर्धा चमचा बेकिंग सोडा, दोन चमचे फ्रूट फ्लेवर्ड जिलेटिन पावडर, चमचाभर काकडीचा रस, दोन चमचे दूध असं साहित्य घ्या. एक बाऊल घ्या. सर्व घटक या बाऊलमध्ये मिसळून घ्या. आता हा बाऊल मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. दहा मिनिटं गरम करा. आता हे वॅक्स हाता-पायांवर लावा. वाळल्यावर काढून टाका. घरी वॅक्सिंग करण्याचा हा सरळ साधा उपाय आहे.



किचन टिप्स

### अशा धुवा भाज्या

सफरचंद, काकडी, स्ट्रॉबेरी, द्राक्षं, पालक आणि बटाट्यांवर घातक रसायनं फवारलेली असतात. त्यामुळे ही फळं आणि भाज्या स्वच्छ धुणं गरजेचं आहे. भाज्या आणि फळं नळाखाली धरून वाहत्या पाण्याखाली धुतली जातात. स्टीकर्स, प्लास्टिक काढून फळं आणि भाज्या स्वच्छ धुवून घ्या. हिरव्या पालेभाज्या धुण्याआधी पाण्यात बुडवून ठेवा. त्यावरची माती हातांनी स्वच्छ करा. मग भाजी पुन्हा धुवून घ्या. मशरूम धुण्यासाठी ओल्या कापडात गुंडाळून ठेवा. सफरचंद, द्राक्ष, पेरू, आंबा, पिच, स्ट्रॉबेरी अशी फळं दोनदा धुवा.



**'टॉयलेट : एक प्रेमकथा'ची बरीच चर्चा झाली. देशात अनेक गावांमध्ये महिलांना उघड्यावर प्रात:विधी करावे लागतात. 'स्वच्छ भारत' सारख्या योजना राबवूनही जुन्या पिढीची मानसिकता न बदलल्याने मुलींना, महिलांना विचित्र परिस्थितीला समोरं जावं लागतं. दिल्लीसारख्या शहरात वाढलेल्या कोमल हडालाने लग्नानंतर उत्तर प्रदेशमधल्या गावात विचित्र परिस्थितीला सामोरं जावं लागताच गावाची विचारसरणी बदलायचं ठरवलं...**

## कथा कोमलची

मानिनी



दिल्लीमधल्या दक्षिणपुरी भागात वाढलेल्या सुशिक्षित कोमल हडालाचं लग्न उत्तर प्रदेशमधल्या निठोरा गावात झालं. या गावातल्या घरांमध्ये शौचालयं नव्हती. महिलांना उघड्यावरच प्रात:विधी उरकावे लागायचे. यासाठी त्यांना पहाटे उठावं लागायचं. थंडी असो वा पाऊस, महिलांना उघड्यावर शौच करण्याशिवाय कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. २१ वर्षांच्या कोमलला हे सगळं बघून धक्काच बसला. सुरुवातीला तिचा नाईलाज झाला. गावातल्या महिला आडोशाची जागा शोधण्यासाठी पहाटेच्या वेळी समूहाने जात. बरेचदा पुरुष त्यांची खिल्ली उडवायचे तर काही वेळा शेतकरी महिलांना दुसरीकडे जायला सांगायचे. यामुळे कोमलला खूप ओशाळल्यासारखं वाटायचं. मग वैतागलेल्या कोमलने पती आणि सासू-सासऱ्यांकडे घरात शौचालय बांधण्याचा तगादा लावला. सुरुवातीला तिला विरोध झाला. जुन्या पिढीला घरात शौचालय बांधणं मान्य नव्हतं. इथूनच तिच्या संघर्षाला सुरुवात झाली.

कोमलने उघड्यावर शौच करण्याचे दुष्परिणाम समजावून सांगितले. रोगराई पसरण्याच्या धोक्याची कल्पना दिली. कुटुंबियांना कोमलचं म्हणणं पटलं आणि तिच्या घरात शौचालय बांधण्यात आलं. पण कोमलने स्वत:पुरता विचार केला नाही. गावातल्या प्रत्येक घरात शौचालय असावं, अशी तिची इच्छा होती. गावकऱ्यांना समजावून सांगण्याचं मोठं आव्हान तिला पेलायचं होतं. यात तिला कुटुंबाची साथ मिळाली. कोमल आणि तिच्या कुटुंबियांनी गावच्या सरपंचांना गावात शौचालयं बांधण्यासाठी पुढाकार घेण्याची विनंती केली.

कोमल, तिच्या कुटुंबातल्या महिला तसंच गावातल्या काही सजग महिलांनी 'निगरानी समिती'ची स्थापना केली. गावातल्या महिलांना शौचालयाचं महत्त्व समजावून सांगणं गरजेचं होतं. हे काम खूप अवघड होतं. कोमलच्या कुटुंबातल्या पुरुषांनी गावातल्या पुरुषांना समजावण्याची जबाबदारी स्वीकारली. सुरुवातीला गावकरी कोणाचं ऐकून घ्यायला तयार नव्हते. कोमल आणि तिच्या सहकाऱ्यांना अपमानित व्हावं लागलं. बरंच काही ऐकून घ्यावं लागलं. त्यांना टोमणे मारणाऱ्यांची कमतरता नव्हती. पण कोमल मागे हटली नाही. तिने समाज सुधारण्याचं काम सुरूच ठेवलं. साधारण वर्षभरानंतर तिच्या प्रयत्नांना यश आलं. निठोरामध्ये २५० शौचालयं बांधण्यात आली. अर्थात गावातल्या महिलांची उघड्यावर प्रात:विधी उरकण्याची सवय एका दिवसात मोडणार नव्हती. मग 'निगरानी समिती'तल्या महिला पहाटे चार वाजता उठून गस्त घालू लागल्या. महिलांना समजावू लागल्या. आज निठोरातली प्रत्येक व्यक्ती शौचालयाचा वापर करू लागली आहे. कोमलच्या प्रयत्नांमुळे आज निठोरा हागणदारीमुक्त झालं आहे. गेल्या वर्षी भारत दौऱ्यावर आलेल्या नॉर्वेच्या पंतप्रधान अर्ना सोलबर्ग यांनी कोमलची भेट घेतली. तिच्या कामाचं कौतुक केलं. हा क्षण आपल्यासाठी अविस्मरणीय असल्याचं कोमल सांगते. आता कोमल गावातल्या महिलांना मासिक पाळीतल्या स्वच्छतेबाबत मार्गदर्शन करते. महिला आणि मुलींच्या सुरक्षेबद्दलही ती प्रयत्नशील आहे.

## स्वत:वर प्रेम करावं!

अदा खानने अनेक वर्षं कामालाच सर्वस्व मानलं. तिला कामाशिवाय दुसरं काही सुचतच नव्हतं. पण अचानक आलेल्या गंभीर आजारपणामुळे तिचे डोळे उघडले. आयुष्यात कामाशिवाय इतरही बरंच काही आहे याची जाणीव तिला झाली. कदाचित उद्या कधी येणारच नाही, असं तिला वाटून गेलं. मग येणारा प्रत्येक क्षण समरसून जगायचं असं तिने ठरवून टाकलं. आयुष्यातल्या या टप्प्याबद्दल अदा व्यक्त होते. ती म्हणते, 'नागीन २' संपल्यानंतर मी आजारी पडले. मला डिहायड्रेशनचा खूप त्रास झाला. रुग्णालयात दाखल व्हावं लागलं बरं नसतानाही मी 'विष या अमृत : सितारा' या मालिकेत काम केलं. त्यावेळी 'कानपूरवाले खुरानाज' या मालिकेचं शूटिंगही सुरु होतं. एकाच वेळी दोन डेली सोप्स करत असल्यामुळे मला आजारपणातून बरं व्हायला अजिबात वेळ मिळाला नाही. आपण कामाव्यतिरिक्त आयुष्यात दुसरं काहीच केलं नाही हे मला त्यावेळी जाणवलं. मी आयुष्यात काहीच बघितलं नाही, असं मनात येऊन गेलं. मी भरपूर काम करून पैसे साठवू शकते किंवा प्रत्येक क्षण समरसून जगू शकते, या दोन्हीपैकी मला एकाची निवड करायची होती. मी दुसऱ्या पर्यायाची निवड करायचं ठरवलं.



सक्षम मी

अदा खान, अभिनेत्री

अदा पुढे म्हणते, आता मी सारख्या मालिका करत नाही. स्वत:साठी वेळ काढते. फिरण्याची आवड जोपासते. गेल्या तीन महिन्यांमध्ये मी भरपूर फिरले. 'सितारा' संपल्यानंतर मी युरोपला गेले. भरपूर मजा केली. आजारपणातून मला खूप काही शिकायला मिळालं. फक्त काम हेच सर्वस्व नाही हे मी जाणलं. स्वत:वर प्रेम करणं खूप गरजेचं आहे. हे आजारपणामुळे शिकता आलं. आपल्या आवडीनिवडी जपणं खूप गरजेचं आहे हे मी जाणलं. आज मी खूप आनंदात आहे. माझं आयुष्य आनंदाने जगते आहे. प्रत्येकाने आपलं आयुष्य आनंदाने जगायला हवं.

## मातीशिवाय लावा कोथिंबिर

परसबाग

कोथिंबिरीला सुगरण म्हटलं जातं. कोथिंबिर कोणत्याही पदार्थाची चव वाढवते. उन्हाळ्यात कोथिंबिर महाग होते. तसंच बाजारातल्या कोथिंबिरीवर रसायनं फवारलेली असतात. तुम्ही घरीच कोथिंबिरीची लागवड करू शकता. महत्त्वाचं म्हणजे कोथिंबिरीची लागवड करण्यासाठी मातीची गरज नाही.

कोथिंबिरीची लागवड करण्यासाठी धने, प्लास्टिकची चाळणी, ॲल्युमिनियम किंवा स्टीलचं पातेलं आणि पाण्यात विरघळणारी खतं हे साहित्य घ्या. यानंतर पातेल्यात पाणी भरा. धने हलक्या हातांनी कुटून घ्या किंवा त्यांचे दोन भाग करा. आता प्लास्टिकची चाळणी घ्या. या चाळणीत धने घाला. सगळ्या बिया एकाच वेळी घालू नका. आठवड्याभराच्या अंतराने बिया घालत राहा. म्हणजे तुम्हाला ताजी कोथिंबिर मिळेल. यानंतर ही चाळणी पाणी भरलेल्या पातेल्यावर ठेवा. या पाण्यात सेंद्रिय खत घाला. बियांमधलं पाणी टिकून रहायला हवं. त्यावर पाणी शिंपडल्यानंतर टिश्यू पेपर ठेवा. साधारण आठवड्याभराने बियांना अंकुर फुटतील. मग त्यावरचा टिशू पेपर काढून टाका. या टिशूला छोटी छिद्रं पाडा. काही काळानंतर कोंब येऊ लागतील. कोथिंबिरीला हळूहळू पाणी घालत रहा. साधारण पंधरा दिवसांनी प्लास्टिकच्या चाळणीखाली मुळं दिसू लागतील. मग थोडं थोडं पाणी शिंपडत राहा. यानंतर आता उरलेले धनेही घाला. दर आठवड्याला थोडे थोडे धने घालता येतील. साधारण ३५ दिवसांनंतर कोथिंबिरीची वाढ झालेली असेल. ही कोथिंबिर मुळापासून काढू नका. फक्त वरची पानं काढून घ्या.





## पती संशय घेतो...

काय करू?

मी ३५ वर्षांची विवाहिता आहे. मला सहा वर्षांचा मुलगा आहे. माझ्या पतीला आमच्या नात्यात खूप असुरक्षित वाटतं. लग्नानंतर त्याने मला संपूर्ण अंग झाकणारे कपडे घालण्याची ताकिद दिली. तो मला इतर पुरुषांशी बोलू देत नाही. त्याने मला नोकरी सोडून मुलाच्या संगोपनासाठी वेळ देण्याचा सल्ला दिला होता. आमच्या लग्नाला आठ वर्षं झाली आहेत. पण त्याच्या वागण्यात काहीच बदल झालेला नाही. माझे ऑफिसमधल्या सहकाऱ्याशी प्रेमसंबंध असल्याचा त्याला संशय आहे. त्याने याच कारणामुळे माझ्या ऑफिसमध्ये येऊन गोंधळ घातला होता. यामुळे मला खूप ओशाळल्यासारखं वाटू लागलं आहे. मी त्याला याबाबत बरेचदा समजावलं आहे. मात्र तो अजिबात ऐकत नाही. हा संशयी स्वभाव सोडला तर माणूस आणि बाप म्हणून तो खूप चांगला आहे. मी काय करू?

– काही कारणांमुळे तुझ्या पतीला अशी असुरक्षितता वाटू शकते. या लोकांना स्वत:बद्दलच असुरक्षितता वाटते. त्यामुळे ते इतरांशीही असंच वागतात किंवा त्यांची जडणघडण असुरक्षित वातावरणात झालेली असू शकते. हा प्रश्न सोडवण्यासाठी त्याच्या मुळावरच घाव घालायला हवा. तू पतीशी धीराने संवाद साध. संयमाने आणि शांतपणे सगळी परिस्थिती समजावून सांग. तुझं त्याच्यावर प्रेम असल्याची जाणीव करून दे. त्याला दुखावणारी कोणतीही कृती तुझ्याकडून घडणार नाही, याची शाश्वती दे. त्याच्या अशा वागण्यामुळे तुमच्या नात्यात वितुष्ट येईल, याची कल्पना दे. गरज वाटल्यास तू समुपदेशकांची मदत घेऊ शकतेस.





## यातून मिळवा प्रथिनं

डाएट अँड न्यूट्रिशन

अंडी, चिकन, दुग्धजन्य पदार्थ, डाळी यात भरपूर प्रथिनं असतात. मात्र शाकाहारी किंवा वेगन लोकांना डाळींशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. मात्र या व्यतिरिक्ती काही घटकांमध्ये प्रथिनं असतात. प्रथिनांच्या पर्यायांविषयी...


- बदाम हा प्रथिनांचा खूप चांगला स्रोत आहे. प्रथिनांसोबत यातून इतरही पोषणमूल्यं मिळतात.
- ग्रीक योगर्टमध्ये अंड्यांपेक्षा अधिक प्रथिनं असतात. ग्रीक योगर्टमध्ये फळं घालून खा. यामुळे हे योगर्ट अधिकच पौष्टिक होईल.
- ओट्स हा सुद्धा प्रथिनांचा चांगला स्रोत आहे. एक कप ओट्समध्ये १३ ग्रॅम प्रथिनं आणि आठ ग्रॅम फायबर असतं. वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत ओट्सची महत्त्वाची भूमिका असते.
- क्विनोआ नावाचं धान्यही लोकप्रिय ठरलं आहे. यातला लायसिन हा घटक स्नायू आणि टिश्यूंची झीज भरून काढतो. यात प्रथिनांचं प्रमाणही बरंच जास्त असतं.
- चिया सिड्समध्येही भरपूर प्रथिनं असतात. चमचाभर चिया सिड्समध्ये तीन ग्रॅम प्रथिनं असतात.
- पीनट बटरमध्येही भरपूर प्रथिनं असतात. पीनट बटर नियमितपणे खाता येईल. यात प्रथिनांसह इतरही घटक असतात.
- मटारांमध्येही प्रथिनं असतात. कपभर मटारांमध्ये आठ ग्रॅम प्रथिनं असतात. प्रथिनं मिळवण्यासाठी तुम्ही मटार खाऊ शकता.

## फॅशन लग्नातली

स्टाईल स्टेटमेंट

सध्याच्या लग्नांमध्ये मेहंदी, संगीत सोहळ्यांनाही खूप महत्त्व आलं आहे. मेहंदी, संगीत सोहळ्यांमध्ये खूप धमाल येते. या विशेष प्रसंगी वैविध्यपूर्ण पेहराव करता येईल. अशाच काही पेहरावांविषयी...

- सध्या रफल साडीची प्रचंड क्रेझ आहे. रफल साडी मेहंदी, संगीत, प्री वेडिंग पार्टी अशा प्रसंगी शोभून दिसते. आधुनिक आणि स्टायलिश लूकसाठी एखादी रफल साडी कॅरी करा.
- शरारा साडी हा पर्यायही तुम्ही ट्राय करू शकता. पँट साडीबद्दल तुम्ही ऐकलं असेल. साडीसोबत पँटऐवजी शरारा घाला. गडद रंगाच्या शराऱ्याची निवड करा. त्यावर सिल्कची प्लेन साडी नेसता येईल.
- पेप्लम टॉप आणि धोती पँट असं कॉम्बिनेशन करता येईल. हा पेहराव खूपच आरामदायी आहे. संगीत किंवा मेहंदी अशा दोन्ही सोहळ्यांमध्ये हा पेहराव खुलून दिसतो.
- प्री वेडिंग पार्टीला जंपसूटही चालून जाईल. गडद किंवा फिकट यापैकी कोणत्याही रंगाचे जंपसूट चालून जातील. जंपसूटवर हाफ लाँग जॅकेट घाला. तुम्ही खूप सुंदर दिसाल.
- ड्रेप ड्रेस हा पर्यायही तुमच्यासाठी आहे. मेहंदी, संगीत यापैकी कोणत्याही प्रसंगात ड्रेप ड्रेस घालता येईल.





## नैसर्गिक मेक अप रिमूव्हर

ब्युटी टॉक

मेक अप काढण्यासाठी मेक अप रिमूव्हरचा वापर केला जातो. मात्र या रिमूव्हरमधल्या रसायनांमुळे त्वचेवर वाईट परिणाम होऊ शकतात. त्यामुळे रिमूव्हर म्हणून नैसर्गिक घटकांचा वापर करणं योग्य ठरतं. मेक अप रिमूव्हरच्या नैसर्गिक पर्यायांविषयी...

- खोबरेल किंवा बदाम तेलाने मेक अप काढता येईल. या तेलांमुळे त्वचेला आवश्यक पोषण मिळतं. कापूस किंवा मेक अप वाईप्सवर तेलाचे चार-पाच थेंब टाकून हलक्या हातांनी मेक अप काढा. चेहऱ्यावरचं तेल काढायची गरज नाही. या तेलामुळे त्वचेला आवश्यक तो ओलावा मिळेल.
- कोरफडीचा गर किंवा ॲलोव्हेरा जेलने मेक अप काढता येईल. घरात कोरफडीचं रोपटं असेल तर त्याचा गर काढा आणि त्याचा मेक अप रिमूव्हर म्हणून वापर करा. अन्यथा, चांगल्या दर्जाचा ॲलोव्हेरा जेल विकत घ्या.
- बेकिंग सोडा आणि मध यांच्या मिश्रणानेही मेक अप काढता येईल. कापसाच्या बोळ्यावर थोडं मध घाला. त्यावर चिमूटभर बेकिंग सोडा घाला आणि मेक अप काढा. या मिश्रणाने चेहऱ्यावरची मृत त्वचाही निघून जाईल.
- डोळ्यांलगतचा मेक अप काढण्यासाठी कच्च्या दुधाचा वापर करता येईल. कापसाचा बोळा कच्च्या दुधात बुडवून मेक अप काढा.
- बेबी ऑईलनेही मेक अप काढता येईल.
- चेहऱ्यावरची धूळ, घाण, प्रदूषित कण आणि मेक अपमधली घातक रसायनं काढून टाकण्याचा पर्याय म्हणजे वाफ घेणं. त्वचेसाठी फक्त १५ मिनिटं द्या. वाफघ्या. यामुळे मेक अप आपोआप निघून येईल. मग कापूस किंवा सौम्य कापडाने चेहरा पुसून घ्या.

हिंदुस्थान
# वलयांकित
movie CLUB
बुधवार, दि. १८ मार्च २०२०

## गॉसिप कॉर्नर

### ट्रोलिंग

#### सुहाना वैतागली...

बॉलिवूड सेलेब्जना ट्रोलिंग नवं नाही. कपड्यांवरुन, लूकसवरुन त्यांना सतत ट्रोल केलं जातं. सोशल मीडिया युजर्स सेलेब्जच्या मुलांनाही सोडत नाहीत. शाहरुख खानची मुलगी सुहाना खान नेहमीच ट्रोलर्सच्या निशाण्यावर असते. मधल्या काळात तिला बरंच ट्रोल करण्यात आलं. या ट्रोलिंगला सुहाना चांगलीच



वैतागली आणि तिने इन्स्टाग्रामवर कॉमेंट्सचा पर्याय बंद करून टाकला. सुहाना बिनधास्त आहे. ती आपल्या आवडीचे पेहराव करते. या पेहरावांवरूनही तिला बरेच बोल लावले जातात. तसंच तिला लेडी शाहरुख खान असंही म्हटलं जातं. सुहानाने इन्स्टाग्राम प्रोफाईल सर्वांसाठी खुलं ठेवलं असलं तरी कॉमेंट्सचा पर्याय बंदच ठेवला आहे. यामुळे तिला कोणी ट्रोल करू शकणार नाही. ट्रोलर्समुळे डोक्याला ताप करून घेण्यापेक्षा कॉमेंट्सचा पर्याय बंद करण्याचा तिचा निर्णय योग्यच म्हणायला हवा.

### रिलेशनशीप्स

#### टिकणार का नातं?

आलिया भट्ट आणि रणबीर कपूर हे बॉलिवूडमधलं हॉट कपल आहे. गेल्या काही दिवसांपासून या दोघांच्या लग्नाच्या चर्चा सुरु आहेत. पण त्यांनी लग्नाबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही. रणबीर



आणि आलिया 'ब्रह्मास्त्र'मध्ये एकत्र दिसणार आहेत. हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर लग्न करण्याचा त्यांचा विचार होता. पण 'ब्रह्मास्त्र'चं प्रदर्शन सातत्याने पुढे ढकललं जात आहे. रणबीर कपूर आणि कतरिना कैफ यांचं 'जग्गा जासूस'च्या शूटदरम्यान बिनसलं होतं. हा चित्रपटही वेळेत पूर्ण झाला नाही. आता 'ब्रह्मास्त्र'बाबतही असंच घडत आहे. त्यामुळे आलिया आणि रणबीर यांचं नातं टिकणार का नाही, याबाबत चर्चा सुरु झाल्या आहेत.

### सेलेब मूड

#### नको तुझी मैत्री!

करिश्मा कपूरने पती संजय कपूरशी घटस्फोट घेतला. या दोघांमधला वाद शिगेला पोहोचला होता. अर्थात घटस्फोटानंतर या दोघांनीही आयुष्य नव्याने सुरु केलं आहे. संजयने प्रिया सचदेवशी लग्न केलं. संजय आणि प्रियाला एक मुलगाही आहे. करिश्मा आणि संजयच्या मुलांवर प्रिया प्रेमाची बरसात करत असते. प्रियाने तिच्या मुलांना वाढदिवसाच्या शुभेच्छाही दिल्या. पण करिश्मा प्रियाशी बोलायला तयार नाही. तिने पुढे केलेला मैत्रीचा हात करिश्माला आपल्या हाती घ्यायचा नाही. त्यामुळे ती प्रियाला फार भाव देताना दिसत नाही.



# ...म्हणून साकारली संयोगिता

**२०१७ मध्ये मानुषी छिल्लर मिस वर्ल्ड ठरली. त्यानंतर आता ती रुपेरी पडद्यावर पदार्पण करणार आहे. मानुषी 'पृथ्वीराज'मधून बॉलिवूड पदार्पण करत आहे. चित्रपटात तिच्यासोबत अक्षयकुमार आहे. बॉलिवूड पदार्पणात व्यावसायिक चित्रपटाऐवजी पिरियड ड्रामाची निवड करण्यामागील कारणं ती विषद करते.**



सौंदर्यस्पर्धा जिंकल्यानंतर सौंदर्यवती बॉलिवूडची वाट धरतात. सुश्मिता सेन, ऐश्वर्या राय, प्रियांका चोप्रा ही अशा सौंदर्यवतींची काही उदाहरणं. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत आता मानुषी छिल्लरही बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहे. बॉलिवूडमध्ये पदार्पण करणाऱ्या अभिनेत्री व्यावसायिक आणि मनोरंजन करणाऱ्या चित्रपटाची निवड करतात. पण मानुषी छिल्लरचं तसं नाही. तिने 'पृथ्वीराज'सारख्या चित्रपटाची निवड केली. 'पृथ्वीराज' हा पृथ्वीराज चौहान यांच्या शौर्याची कथा सांगणारा चित्रपट आहे. पिरियड ड्रामा किंवा बायोपिक प्रकारात मोडणाऱ्या चित्रपटाची निवड करायला धाडस लागतं. मानुषीने ते केलं आहे. बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्यासाठी 'पृथ्वीराज'सारख्या चित्रपटाची निवड करण्यामागची कारणं ती विषद करते. मानुषी म्हणते, 'पृथ्वीराज'सारख्या चित्रपटात संधी मिळणं ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. हा खरं तर माझाच सन्मान आहे. चित्रपटासाठी मी १०० टक्के योगदान देण्याच्या तयारीत आहे. प्रेक्षकांचं प्रेम मिळावं यासाठी मी सगळं लक्ष कामावर केंद्रित केलं आहे. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर लोकांचं प्रेम मिळावं असा माझा प्रयत्न आहे. काम करताना मी कोणतीही कसर ठेवलेली नाही. भारतीय चित्रपटांमध्ये महिलांचं चित्रण विशिष्ट पध्दतीने केलं जातं. मलाही या चित्रपटांमधल्या महिलांची विशिष्ट प्रतिमा जपायची आहे. चित्रपटांमधल्या महिला सक्षम, स्वतंत्र, दूरदृष्टी असणाऱ्या, स्वतःचं मत ठामपणे मांडणाऱ्या असतात. मलाही अशाच महिलांचं प्रतिनिधीत्व करायचं आहे.

'पृथ्वीराज'मध्ये मानुषी छिल्लर संयोगिता ही व्यक्तिरेखा साकारत आहे. या व्यक्तिरेखेबद्दल ती म्हणते, संयोगिताची भूमिका करायला मिळणं ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. ही भूमिका करायला मिळाल्यामुळे मी खूपच आनंदी आहे. संयोगिता ही व्यक्तिरेखा पडद्यावर साकारणं माझ्यासाठी खूप मोठं आव्हान होतं आणि हे आव्हान पेलण्याचा मी पूर्ण प्रयत्न केला आहे. मला आव्हानं स्वीकारायला खूप आवडतं. दिग्दर्शकाने माझ्यावर विश्वास टाकला आहे आणि हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मी झटत आहे. मला माझी जबाबदारी पूर्ण करायची आहे. या चित्रपटाकडून मला खूप अपेक्षा आहेत. तसंच प्रेक्षकांनाही माझ्याकडून बऱ्याच अपेक्षा असतील. सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा मी पूर्ण प्रयत्न करेन.

# आयुष्मान ॲक्शनपटात?

**आयुष्मान खुराना आणि अनुभव सिन्हाच्या 'आर्टिकल १५' ला चांगलं यश मिळालं. आता आयुष्मान अनुभव सिन्हासोबत ॲक्शनपट करण्याच्या तयारीत आहे.**

आयुष्मान खुराना आणि अनुभव सिन्हा यांच्या जोडीने 'आर्टिकल १५'सारखा चित्रपट दिला. या चित्रपटाचं खूप कौतुक झालं. आयुष्मान खुरानाच्या अभिनयाची तोंड भरुन प्रशंसा करण्यात आली. आता आयुष्मान आणि अनुभव सिन्हा नवा चित्रपट घेऊन येणार आहेत. या दोघांचा पुढचा चित्रपट हा ॲक्शनपट असेल अशी चर्चा आहे. अनुभव सिन्हाने तापसी पन्नूसोबत 'थप्पड' केला. समिक्षकांनी 'थप्पड'चं खूप कौतुक केलं. प्रेक्षकांनाही हा चित्रपट आवडला. दरम्यान, आयुष्मान सध्या आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवत आहे. सध्या तो सुट्टी एंजॉय करत आहे. आपल्या आगामी चित्रपटाबाबत या दोघांनी कोणतंही सुतोवाच केलेलं नाही. त्यांच्याकडून कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र हे दोघं नव्या चित्रपटासाठी सज्ज होत असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. आयुष्मान खुरानाने आजवर ॲक्शनपट केलेला नाही. म्हणूनच अनुभव सिन्हासोबत तो ॲक्शनपट करू शकतो, असं जाणकारांचं म्हणणं आहे. आयुष्मानने विविधांगी भूमिका साकारल्या आहेत. प्रत्येक भूमिकेत तो शोभून दिसला. आता त्याला ॲक्शन करताना बघणं ही चाहत्यांसाठी पर्वणीच ठरणार आहे. अनुभव आणि आयुष्मानने एकत्र चित्रपट करावा, अशी त्याच्या चाहत्यांची अपेक्षा आहे. त्यामुळे आता ही जोडी जमणार का, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. आयुष्मान आणि अनुभव सिन्हाकडून चित्रपटाची अधिकृत घोषणा कधी होणार याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.



# मला कॅट हवी...

**'बाहुबली'मुळे अभिनेता प्रभासला बॉलिवूडमध्ये ओळख मिळाली. त्यानंतर त्याचा 'साहो' आला. प्रभासला कतरिना कैफसोबत काम करायचं आहे. कॅटसोबत काम करण्यासाठी काहीही करायची त्याची तयारी आहे.**



अभिनेता प्रभास कतरिना कैफचा चाहता आहे. त्याला कॅटसोबत चित्रपट करायचा आहे. 'साहो'मध्ये त्याला ही संधी मिळणार होती. पण ती हुकली. 'साहो'मध्ये त्याला श्रद्धा कपूरसोबत काम करावं लागलं. पण आता त्याची कॅटबरोबर काम करण्याची इच्छा पूर्ण होणार आहे. प्रभासनेच हे शक्य करून दाखवलं आहे. दिग्दर्शक नाग अश्विनच्या आगामी चित्रपटात कॅट आणि प्रभास एकत्र काम करू शकतात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रभास सध्या एका चित्रपटाच्या शूटमध्ये व्यस्त आहे. हा चित्रपट पूर्ण झाल्यानंतर तो नाग अश्विनच्या चित्रपटाचं काम सुरू करणार आहे. बॉलिवूडमधल्या काही अभिनेत्रींनी टॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. श्रद्धा कपूर 'साहो'मध्ये झळकली. पवन कल्याणच्या आगामी चित्रपटात जॅकलिन फर्नांडिस काम करणार आहे तर अनन्या पांडे विजय देवराकोंडासोबत 'फायटर'मध्ये दिसणार आहे. त्यामुळे आता चाहत्यांना प्रभासने आणखी एका बॉलिवूड अभिनेत्रीसोबत काम करावं असं वाटू लागलं आहे. नाग अश्विनही आपल्या आगामी चित्रपटासाठी कतरिना कैफचा विचार करत असल्याचं कळतंय. 'साहो'मध्ये कतरिना कैफने काम करावं अशी प्रभासची इच्छा होती. पण काही कारणांमुळे हा योग जुळून आला नाही. मग प्रभासला दुधाची तहान ताकावर भागवावी लागली. पण आता प्रभासला नकार ऐकायचा नाही. त्याला कोणत्याही परिस्थितीत कॅटसोबत काम करायचं आहे. त्यामुळे आता कॅट आणि प्रभासची जोडी जमणार का, हे पहावं लागणार आहे.



# साडीतली शिल्पा

**शिल्पा शेट्टीने नव्वदीचं दशक चांगलंच गाजवलं. आई झाली असली तरी शिल्पा आधीपेक्षाही छान दिसते. ती प्रत्येक लूकमध्ये आकर्षक दिसते. त्यातही साडीत तिचं सौंदर्य अधिकच खुलतं.**

शिल्पा शेट्टी म्हणजे बॉलिवूडमधली तंदुरुस्त अभिनेत्री. शिल्पाने आपला फिटनेट जपला आहे. शिल्पा प्रत्येक पेहरावात छान दिसते. पाश्चिमात्य पेहरावांसोबतच साडीतही ती शोभून दिसते. अशा या शिल्पाने विविध प्रसंगी सुंदर साड्या नेसल्या. तिची प्रत्येक साडी लाखमोलाची. साडीतला तिचा लूक प्रत्येकालाच आकर्षित करून गेला. शिल्पा शेट्टी पत्नी, आई, अभिनेत्री आणि उद्योजिका अशा सगळ्या भूमिका अगदी सहज वठवते. मध्यंतरी शिल्पाने पाटोलू साडी नेसली होती. अत्यंत सुंदर अशी ही साडी मयूर गिरोत्राने डिझाइन केली होती. या साडीवर इक्कट वर्क होतं. त्यावर तिने अत्यंत आकर्षक असे दागिने घातले होते. शिल्पाने गुलाबी रंगाची श्रीडी पर्ल साडी नेसली होती. यावर तिने शिफॉनचा ब्लाउज घातला होता. या साडीत शिल्पाच्या सौंदर्याला चार चांद लागले होते. एका कौटुंबिक सोहळ्यात शिल्पा अगदी छान सजली होती. तिने गुलाबी रंगाची सिल्कची साडी नेसली होती. या साडीवर पट्ट्यांचं डिझाइन होतं. त्यावर तिने सोनेरी झुमके घातले होते. तिच्या हातात सोनेरी बांगड्या शोभून दिसत होत्या. शिल्पाने नेसलेली आजवरची सर्वात सुंदर साडी म्हणजे सिंदुरी साडी. व्हेलवेट लूकवाली ही साडी कोणालाही हवीहवीशी वाटणारी. शिल्पाने साडीतच रेट्रो लूक केला होता. तिने काळी-पांढरी पोलका डॉट साडी नेसली होती. तिचं ब्लाउजही खूप सुंदर होतं.



### बॉक्स ऑफिस

#### बॉलिवूडचा खिसा रिकामाच

बॉलिवूडसाठी २०२० ची सुरुवात दणक्यात झाली. 'तान्हाजी : द अनसंग वॉरियर'ने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. पण त्यानंतर बॉलिवूडला जबरदस्त हिट मिळालेला नाही. बॉक्स ऑफिसच्या आकड्यांचा विचार केला तर २०१९ च्या तुलनेत २०२० चे तीन महिने बॉलिवूडसाठी फारसे आशादायक ठरलेले नाहीत.



'बागी ३' आणि 'अंग्रेजी मीडियम' हे दोन चित्रपट बॉक्स ऑफिसवरचा दुष्काळ संपवतील अशी अपेक्षा होती. मात्र कोरोना व्हायरसमुळे बॉलिवूडला मोठा धक्का बसला आहे. अक्षयकुमारच्या 'सूर्यवंशी'चं प्रदर्शन पुढे ढकलण्यात आलं आहे. 'बागी ३' आणि 'अंग्रेजी मीडियम'ने अपेक्षित कामगिरी केलेली नाही. यंदाच्या मार्च महिन्यात बॉलिवूडपटांनी १०७.१५ कोटी रुपये कमावले आहेत. त्यात 'अंग्रेजी मीडियम'ने १०.३ कोटी रुपये तर 'बागी ३' ने ९७.१२ कोटी रुपये व्यवसाय केला आहे. २०१९ च्या मार्च महिन्यात बॉलिवूडने ३६९.७२ कोटी रुपये कमावले होते. त्या तुलनेत यंदा बॉलिवूडचा खिसा रिकामाच राहिला आहे.

### वाहिनीविश्वात

#### 'मुझसे शादी करोगे' गुंडाळणार गाशा

'मुझसे शादी करोगे' हा कार्यक्रम प्रेक्षकांचा निरोप घेत आहे. 'बिग बॉस १३' संपल्यानंतर हा रिॲलिटी शो सुरु झाला. हा कार्यक्रम १३ आठवडे सुरू राहणार होता. पण फक्त सहा आठवड्यांमध्येच त्याला गाशा गुंडाळावा लागत आहे. 'मुझसे शादी करोगे'ची जागा 'एक बार फिर इश्क में मरजावां'हा कार्यक्रम घेणार आहे. या कार्यक्रमाला फारसा टीआरपी मिळालेला नाही. कार्यक्रमाचा टीआरपी वाढवण्याचे बरेच प्रयत्न झाले. पण काहीच उपयोग झाला नाही. अखेर निर्मात्यांनी हा कार्यक्रम गुंडाळण्याचा निर्णय घेतला.



### मायमराठी



#### अहिल्याबाईंचं चरित्र रुपेरी पडद्यावर...

ऐतिहासिक चित्रपट, चरित्रपटांची निर्मिती करताना बरंच संशोधन करावं लागतं. इतिहासात घडलेल्या घटना रुपेरी पडद्यावर उतरवणं सोपं नसतं. सध्या 'अहिल्यादेवी होळकर' या चित्रपटाची चर्चा आहे. या चित्रपटावर बरंच काम सुरु आहे लेखकांची टीम संशोधनात गुंतली आहे. अहिल्याबाई होळकर यांचं आयुष्य रुपेरी पडद्यावर मांडताना कोणतीही चूक होऊ नये, असा प्रत्येकाचाच प्रयत्न आहे. दिलीप भोसले या चित्रपटाचं दिग्दर्शन करणार आहेत. यानिमित्ताने अहिल्याबाईंचं कार्य लोकांसमोर येणार आहे.

### वेब वर्ल्ड

#### बोलबाला परदेशी कार्यक्रमांचा

नेटफ्लिक्सने आपली टॉप १० कार्यक्रमांची यादी जाहीर केली आहे. या यादीत परदेशी वेब मालिका आणि चित्रपटांनी आघाडी घेतल्याचं पहायला मिळलं. पहिल्या दहा कार्यक्रमांमध्ये फक्त दोन हिंदी चित्रपट आहेत. 'गिल्टी' आणि 'पानीपत' यांनी पहिल्या दहा कार्यक्रमांमध्ये स्थान पटकावलं आहे. यासोबत अलू अर्जुनचा 'अला वैकुंठपुरमलू' हा चित्रपटही पहिल्या दहांमध्ये आहे. मात्र उर्वरित सात चित्रपट किंवा वेब मालिका परदेशी आहेत. करण जोहरची निर्मिती असणाऱ्या 'गिल्टी'मध्ये कियारा अडवाणी प्रमुख भूमिकेत आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे तर 'पानीपत' दहाव्या स्थानी आहे.

